दिव्य मराठी
३ भाषा | १२ राज्ये | ६५ आवृत्त्या
मध्य प्रदेश | छत्तीसगड | राजस्थान | नवी दिल्ली
पंजाब | चंदिगड | हरियाणा | हिमाचल प्रदेश | झारखंड
बिहार | गुजरात | महाराष्ट्र

महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र

जय 'आर्यावर्त'!

रसिक स्पेशल
वैभव छाया
vaibhav.pragatik@gmail.com

'डिस्टोपिया' म्हणजे स्वप्नवत किंवा आदर्श अशा 'युटोपिया'च्या विरुद्ध असा भयावह समाज. हुकूमशाही, फॅसिझम असलेल्या अशा डिस्टोपियन स्वरूपाच्या कलाकृती अगदी भविष्याचे भाकीत करून चिंतेत पाडत नसल्या तरी वर्तमानात, आपल्या सभोवती समाजात अशा वृत्ती असतातच... जॉर्ज ऑरवेलची '१९८४' किंवा रे ब्रॅडबरीची 'फॅरनहाइट ४५१' या कादंबऱ्यांच्या रांगेत मोडणारी पत्रकार प्रयाग अकबर यांची 'लैला' ही अशीच एक डिस्टोपियन कादंबरी... याच कादंबरीवर आधारित 'लैला' ही वेब सिरीज आपण अशा डिस्टोपियाच्या दिशेने वाटचाल करत आहोत का, अशी शंका उपस्थित करते.

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला आणि नियतीशी आपला करार सुरू झाला. हा करार शंभर वर्षांनंतर आजच्या राजकीय परिस्थितीला अनुसरून कसा असेल याचे यथार्थ वर्णन करणारी 'लैला' ही वेब सिरीज नुकतीच 'नेटफ्लिक्स'वर रिलीज झाली आहे.

लैलाचे कथानक काय आहे, हे सांगण्यासाठी म्हणून हा लेख नाही. लैलामध्ये काय घडतं, कसं घडतं यासाठी ती सिरीज पाहावी लागेल. हा लेख या सिरीजचे जे 'सोशिओ पॉलिटिकल इम्पॅक्ट' आहेत त्यावर आहे. पत्रकार प्रयाग अकबर यांनी २०१७ मध्ये 'लैला' या शीर्षकाखाली लिहिलेल्या कादंबरीवरच ही सिरीज आधारित आहे... दिग्दर्शन केलंय दीपा मेहता यांनी. लैलाचे ट्रेलर लाँच झाल्यापासून ही सिरीज सोशल मीडियावर चर्चेत होती. उजव्या विचारसरणीच्या युजर्सनी नाके मुरडलीयेत, सिरीजला वेड्यात काढले आहे. तर दुसऱ्या बाजूस तर्कनि, विवेकाने वागणाऱ्या प्रागतिक बुद्धिवादी युजर्सनी या सिरीजला ब्राह्मण्यवादावर तिखट प्रहार म्हटले आहे. तर जातीअंतक चळवळीत अग्रेसर असणाऱ्या बुद्धिवादी कार्यकर्त्यांनी या सिरीजला ब्राह्मण्यवादी राजकारणापर्यंत जाणारी, परंतु अभिजन कंपनीत लिमिटेड असलेली ताकदवान सिरीज म्हटलंय.

पूर्णपणे काल्पनिक असलेली 'लैला'ची कथा २०४७ सालची म्हणजे भारत स्वतंत्र झाल्यानंतरच्या शंभर वर्षांनंतरची... हा बदललेला भारत आहे, ज्याचे नावसुद्धा बदललेले आहे. उजव्या विचारसरणीच्या, संवैधानिक व्यवस्था नसलेल्या, एकछत्री कारभार असलेल्या या देशाचा नायक आहे डॉ. जोशी आणि देशाचे नाव आहे आर्यावर्त. तांत्रिकदृष्ट्या प्रचंड प्रगत असलेल्या या देशात राहणाऱ्या प्रत्येकाच्या प्रत्येक प्रकारचा डेटा सरकारी यंत्रणेकडे आहे. आर्यावर्तामध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रत्येक गोष्टीत सर्व्हिलन्सला सामोरे जावे लागतंय, ते करत असलेली प्रत्येक गोष्ट सरकारी निगराणीत आहे. ही निगराणी अधिक काटेकोर व्हावी यासाठी 'गेस्टापो'सारखी सिक्रेट पोलिस सर्व्हिसदेखील आहे. पाणी सहज उपलब्ध नाही, पाण्याचे रेशनिंग चालू आहे. पाणी ही 'लक्झरी कमोडिटी' बनलीये. कुणीही मोकळ्या वातावरणात फिरू शकत नाही, तोंडाला एअर फिल्टर मास्क लावल्याशिवाय श्वास घेणे अशक्य आहे. आर्यावर्तामधल्या शाळांत आर्यपद्धतीने वंशश्रेष्ठत्वाचे शिक्षण देणारी शिक्षणव्यवस्था आहे. त्या व्यवस्थेद्वारे लहान मुलांचे मेंदू लहान वयातच प्रोपोगंडाने बांधून त्यांचे नीट प्रोग्रॅमिंग केले जातेय. या शिक्षणव्यवस्थेत शिकण्याचा अधिकार फक्त शुद्ध रक्तबीजाच्याच मुलांना आहे. जी मुले शुद्ध रक्तबीजाचे नाहीत त्यांची रवानगी 'प्रोजेक्ट बळी'मध्ये करून कायदेशीररीत्या त्यांचे खून करण्याचा कायदा आहे. या कथेची नायिका आहे शालिनी रिझवान चौधरी ऊर्फ शालिनी पाठक. तिला या सर्व परिस्थितीतील यातनांशी दोन हात करावे लागतात.

लैलाची कथा डॉ. जोशी या कॅरेक्टरभोवती फिरते. सहा भागांत प्रकाशित झालेल्या या सिरीजच्या पहिल्या पाच भागांत डॉ. जोशी थेट दिसत नसला तरी त्यांच्याच अवतीभोवती फिरणारे आणि त्यांच्या नावाने प्रभावित असलेले जग सातत्याने आपल्याला पाचरवत राहते. सिरीजच्या सुरुवातीपासूनच 'आर्यावर्त' नावाच्या देशात राहणाऱ्या सर्व समुदायांनी निवडलेला नेता म्हणून डॉ. जोशींचा जयजयकार सतत घुमत राहतो. त्यांचा मुख्य उद्देश विभिन्न जात-धर्म समुदायांच्या विभाजनातून शांतता कायम करण्याचा असतो. हे समुदाय त्यांच्या त्यांच्या संख्याबळानुसार विविध 'सेक्टर'मध्ये विभाजित केले आहेत. त्यांचे विभाजन करताना आधुनिक शहरांतील आताची सेक्टर पद्धती आहे. हे सर्व सेक्टर उंचच उंच भिंतींनी एकमेकांशी विभक्त आहेत. प्रत्येक सेक्टरचे स्वतःचे असे स्वतंत्र नियम आहेत. हे नियमवजा कायदे पाळणे त्यांच्यासाठी बंधनकारक आहेत. न पाळणाऱ्यांची मृत्युदंड अथवा श्रमकेंद्र असं गोंडस नाव दिलेल्या छळछावणीत रवानगी आहे. पूर्ण सहा भागांची सिरीज काळ्याकुट्ट, कुंद, दमट, धुरकट वातावरणात आपल्या डोळ्यांना दिसते. त्यामुळे कथेतला हिंसक आणि निराशाजनक भाव आपसूकच पूर्ण सिरीजच्या कथानकाचा भाव आपल्या मनावर बिंबवून जातो.

> या कथेत सुरुवातीपासून शेवटपर्यंत एका मंत्राचे वारंवार उच्चारण कानी पडते, तो मंत्र म्हणजे, हमारा जन्म ही हमारा कर्म है. हा मंत्र शुद्धीकरण केंद्रातील प्रत्येक कैदी महिलेला वारंवार ऐकावा लागतो, म्हणावा लागतो, त्याचा जाप करावा लागतो. हे अगदी ब्राह्मण्यवादी व्यवस्थेतील जाती नियुक्तीच्या नियमांप्रमाणेच आहे.

या कथेत सुरुवातीपासून शेवटपर्यंत एका मंत्राचे वारंवार उच्चारण कानी पडते, तो मंत्र म्हणजे, हमारा जन्म ही हमारा कर्म है. हा मंत्र शुद्धीकरण केंद्रातील प्रत्येक कैदी महिलेला वारंवार ऐकावा लागतो, म्हणावा लागतो, त्याचा जप करावा लागतो. हे अगदी ब्राह्मण्यवादी व्यवस्थेतील जातीनियुक्तीच्या नियमांप्रमाणेच आहे. जिथे ज्याचा जन्म तिथेच त्याचं मरण, जातीपातीच्या या उतरंडीत तो ना वर जाऊ शकत ना तेथून खाली येऊ शकत. यावरून आर्यावर्तामधली व्यवस्था ही चिनशिडयांची छळछावणी असलेली इमारत आहे, याची जाणीव सतत मेंदूला होत राहते. प्रत्येक सेक्टरच्या भिंतीच्या पलीकडे डंपिंगचे मोठमोठाले ढीग आहेत... त्यातून सातत्याने बाहेर पडणारे मिथेनचे लोट पेट घेताहेत... आगीचे लोळ पसरताहेत... आगीचे लोळ पसरवणाऱ्या डंपिंगच्या मधोमध झोपडपट्ट्या आहेत... घरवजा झोपड्यांचे रंग निळे आहेत... काही ठिकाणी हिरवे आहेत... हे 'मेटाफर' आहे, वस्त्यांत राहणाऱ्या लोकांच्या जात-धर्म चरित्र वास्तवाचे. झोपडपट्ट्यांमधील लोक रोज एकमेकांशी भांडताहेत, मारामाऱ्या करताहेत, घोटभर स्वच्छ पाण्यासाठी. काळ्या ढगांची सावली पडू लागली की भांडण सोडून जिथे आडोसा मिळेल तिथे लपताहेत कारण पडणारा पाऊस आता काळ्या रंगाचं पाणी घेऊन बरसतोय. ह्या पाण्यानं सुख नव्हे, तर अंग जाळणारं दुःख बरसतंय. या सेक्टरना विभक्त करणाऱ्या भिंती विद्रोहीच्या घोषणांनी भरून गेल्यात. पण काळा पाऊस त्या घोषणांना, एल्गारांना धुऊन मिटवण्यात अशक्तच वाटतोय. इथे प्रत्येक माणसाच्या शरीराचे बायोमेट्रिक केले गेले असून त्यानुसार त्यांचे वर्गीकरण केलेले आहे. हे वर्गीकरण अगदी जाती व्यवस्थेप्रमाणेच आहे. आर्यावर्तामध्ये कुणाला प्रवेश, कोण निषिद्ध हे त्यांच्या हातावर गोंदवले गेलेल्या टॅटूवरून ठरते. हा टॅटू ज्यू समूहाने उभ्या केलेल्या सिक्रेट सोसायटीच्या सिंबॉलिझमशी साधर्म्य साधणारा आहे. हा सिंबॉल ठरवतो प्रत्येक माणसाचे आर्यावर्तामधील स्टेटस... हे स्टेटस त्यांनी ठरवलंय त्या व्यक्तीच्या रक्तावरून. कोण शुद्ध रक्ताचे, कोण अशुद्ध रक्ताचे यावरून कोण छळछावणीत जाणार कोण आर्यावर्तामध्ये राहणार याची ठरवणूक होते. डॉ. जोशीने बनवलेले हे सर्व नियम जो तोडेल त्याला बळजबरीने सिक्रेट पोलिस शुद्धीकरण केंद्रात पाठवतात. शुद्धीकरण केंद्रात पाठवल्यानंतरही जर कुणी तयार झाले नाही, तर त्यास विषारी गॅस चेंबरमध्ये डांबून मारून टाकण्याची शिक्षा आहे.

ही आधुनिक पद्धतीची आधुनिक मनुद्वारे तयार केली गेलेली आणि तंत्रज्ञानाचा आधार घेऊन अधिक जुलमी पद्धतीने राबवली जाणारी मनुव्यवस्था आहे. यात शुद्ध बीजाव्यतिरिक्त असलेल्या प्रत्येक व्यक्तीला 'दूष' म्हटले जाते. अगदी शुद्धीकरण केंद्रात कैदी म्हणून असलेल्या महिलादेखील स्वतःचं शोषण होत असतानाही त्यांनी एकमेकींना दूष म्हटलेले पटत नाही. दूष ही त्यांच्यासाठी प्रचंड मोठी शिवी आहे. आर्यावर्तामध्ये महिलांच्या शुद्धीकरणावर सर्वात जास्त जोर दिलेला आहे. हा जोर आज एकविसाव्या शतकात आहे तसाच आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. महिलांवरील वर्चस्वाशिवाय ब्राह्मण्यवादाची मुळे तग धरू शकत नाही हा त्या व्यवस्थेचा पहिला नियम आहे, जो मनुकाळापासून आजतागायत चालू आहे. कारण मनुवादात जातींचे शुद्धीकरण, महिलांचे शुद्धीकरण खूप महत्त्वाचे मानले जाते. म्हणूनच आर्यावर्तामध्ये परधर्मात लग्न करणाऱ्या, निम्न जातीत लग्न करणाऱ्या, बापाच्या संपत्तीत हक्क मागणाऱ्या स्त्रिया यांना दूष आणि गुन्हेगार ठरवण्यात आलेले आहे. अशा महिलांना पकडून थेट वनिता कल्याण केंद्र नावाने चालणाऱ्या महिला शुद्धीकरण केंद्रात डांबले जाते. त्यांच्यावर आरोप लागतो तो देशद्रोहाचा. या पापातून मुक्त होण्यासाठी त्या महिलांना आपल्यासारख्याच दोन देशद्रोही महिलांचा खून करावा लागतो. त्याशिवाय त्या कैदी महिला देशद्रोही असल्याच्या पापातून मुक्त होत नाहीत.

आज आपण २०१९ मध्ये जगतोय. आपल्या हातांच्या रेषांपासून डोळ्यांच्या बुबुळांपर्यंतचा डेटा सरकारकडे आहे. त्या पद्धतीने आपण आपल्या शरीराचे

» उर्वरित पान ४

आधुनिक मदरसे... एक नवी पहाट!

रसिक स्पेशल
कलीम अजीम
kalimazim2@gmail.com

पंतप्रधान मोदींनी आपल्या पहिल्या भाषणातच मुस्लिमांच्या कल्याणासाठी योजना जाहीर केल्या. मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी ५ कोटींची स्कॉलरशिप, मुस्लिम मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन योजना आणि मदरशांचे आधुनिकीकरण... प्रथमदर्शनी सरकार मुस्लिमांसाठीच्या वरील योजनांबद्दल अभिनंदनास पात्र आहे. गेल्या पाच वर्षांतील मुस्लिमांच्या सामाजिक सुरक्षेवर घाला घालणाऱ्या भाजपकडून उशिरा का होईना मुस्लिमांच्या संविधानिक अधिकारासाठी कल्याणकारी उपक्रम सुरू केलेला आहे. पण हा विश्वासघात ठरू नये अशी अपेक्षा तूर्तास करता येईल.



लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर विदेशी व देशी माध्यमांनी भारतातील अल्पसंख्याकांबद्दल विशेषतः मुस्लिमांबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांची धास्ती नक्की रास्त होती. ही भिती भाजप सरकारच्या गेल्या पाच वर्षांतील वादग्रस्त कार्यकाळाशी संलग्न होऊन आलेली होती. विजयानंतर मोदी सरकारवर अवघ्या जगाची नजर लागली होती. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी आपल्या पहिल्या भाषणातच अल्पसंख्याक समुदायाच्या हिताच्या रक्षणाची हमी दिली आणि जगाचे लक्ष आपल्याकडे वळवून घेतले. मुसलमानांवर झालेल्या हल्ल्यांमुळे मागचे सरकार काळवंडले होते, त्यांना चुचकारण्याची भूमिका मोदींनी घेतली होती.

२०१४ साली मोदींनी संसदेत पंतप्रधान म्हणून आपलं पहिलं-वहिलं भाषण दिलं. त्या वेळी त्यांनी अल्पसंख्याकांना विकास प्रक्रियेत मागे ठेवला जाणार नाही, असे म्हणत मुस्लिमांबद्दल सहानुभूती दर्शवली होती. मदरसा शिक्षण पद्धतीत आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार त्यांनी या भाषणात केला होता. तसं पाहिलं तर मोदींच्या आताच्या व पूर्वीच्या भाषणात फारसा वेगळेपणा आढळत नाही. पंतप्रधान म्हणून पहिलं भाषण असल्याने साहजिकच दोन्ही वेळी जागतिक मीडियाचं लक्ष मोदींकडे लागलं होतं. त्यामुळे त्यांनी अतिशय विचारपूर्वक दोन्ही वेळा भाषणे दिली.

२०१४ नंतर भारतीय मुसलमानांसोबत काय झालं हे अवघ्या जगाला माहीत आहे. त्याची पुन्हा उजळणी नको. कारण कोळसा कितीही उजळला तरी तो काळाच होणार. त्यातून नवनिर्मिती शक्य नाही. त्यामुळे 'बीती बातों को भुलाकर नयी पहाट शोधू या.' या उक्तीप्रमाणे मोदींच्या या घोषणेकडे मुस्लिम समुदाय पाहात आहे. पंतप्रधान मोदींनी एकापाठोपाठ एक अशा मुस्लिमांच्या कल्याणासाठी योजना जाहीर केल्या. त्यात मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी ५ कोटींची स्कॉलरशिप, मुस्लिम मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन योजना आणि मदरशांचे आधुनिकीकरण होते. भाजपविरोधी राजकीय पक्ष याला 'मुस्लिमांचा अनुनय' म्हणून त्याविरोधात प्रचार करणार नाहीत. त्यामुळे यंदा या योजना शेवटच्या घटकापर्यंत जातील अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. प्रथमदर्शनी सरकार मुस्लिमांसाठीच्या वरील योजनांबद्दल अभिनंदनास पात्र आहे. गेल्या पाच वर्षांतील मुस्लिमांच्या सामाजिक सुरक्षेवर घाला घालणाऱ्या भाजपकडून उशिरा का होईना मुस्लिमांच्या संविधानिक अधिकारासाठी कल्याणकारी उपक्रम सुरू केलेला आहे. पण हा विश्वासघात ठरू नये अशी अपेक्षा तूर्तास करता येईल.

वास्तविक, या योजना नव्या वाटतील पण खरे सांगायचे झाल्यास त्या जुन्याच आहेत. २०१४ साली सत्तेवर येताच भाजप सरकारने मदरसा आधुनिकीकरणासाठी अर्थसंकल्पात तब्बल १०० कोटींची तरतूद केली. दुसरीकडे २०१८ साली सरकारने पदवीधर मुस्लिम मुलींच्या लग्नासाठी ५१ हजार रुपयांची भेट म्हणून 'शगुन योजना' सुरू केली होती. दोन्ही तरतुदी कागदी घोषणातून बाहेर आल्या नाहीत. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात दिल्लीत मदरसा शिक्षकांनी थकित वेतनासाठी आंदोलन केलं होतं. (आठ दिवसांपूर्वी पुन्हा याच मागणीसाठी दिल्लीत आंदोलन झालेले आहे.) गेल्या अडीच वर्षांपासून कुठलेही वेतन मिळाले नसल्याचा आरोप या वेळी आंदोलकांनी केला होता. तर दुसरीकडे शगुन योजनेचे काय झालं कुणालाही माहीत नाही.

> आज बहुतेक मदरसे धार्मिक शिक्षणापुरते बंदिस्त झाले आहेत. ज्यातून धर्मतत्त्वज्ञानासारखे मूल्यशिक्षण मिळते, पण रोजगाराची साधने नाहीत. मूल्यशिक्षणातून नैतिकता जोपासली जाते, पण रोजगारासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणच महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे आज बदलत्या काळात मुस्लिम समाजाने आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे.

सुधारणांची गरज

२००५ मध्ये यूपीए सरकारच्या काळात मुस्लिमांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी न्या. राजेंद्र सच्चर आयोगाची स्थापना झाली, वर्षभरात समितीने आपला रिपोर्ट सरकारला सादर केला. मुस्लिमांची सामाजिक अवस्था दलितांपेक्षा वाईट असल्याचे निरीक्षण अहवालातून नोंदवण्यात आले. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी एका बैठकीत देशाच्या प्रगतीवर मुसलमानांचा हक्क आहे. त्यांच्या प्रगतीसाठी नावीन्यपूर्ण योजना आखल्या पाहिजेत, असा मुद्दा मांडला केला. सरकारच्या या घोषणेनंतर दिल्लीत भाजपची बैठक झाली. बैठकीतून बाहेर पडताच गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदींनी काँग्रेस सरकार मुस्लिमांचा अनुनय करत आहे, हे आम्ही कदापि होऊ देणार नाही, अशी घोषणा करत त्यांनी सरकारच्या निवेदनावर हल्ला चढवला. परिणामी, सरकार बिचकले आणि अल्पसंख्याकांच्या प्रगतीची आशा मावळली, आयोगाच्या शिफारशी फायलीत अडकून पडल्या.

तत्पूर्वी २००५ मध्ये सरकारने अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी १५ सूत्री कार्यक्रम तयार करून तो लागू करण्याची घोषणा केली. त्यानुसार सरकारकडून मदरसा आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. मदरशांमधील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण प्रणालीशी जोडून त्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याची ही योजना होती. यातून विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण तसेच मदरसा शिक्षकांना मानधन मिळणार होते. सुरुवातीला अनेक धार्मिक संघटनांनी या योजनेला विरोध केला. आधुनिकीकरणातून सरकार धार्मिक शिक्षणात हस्तक्षेप करू पाहत आहे, असा आरोप देवबंद पीठासारख्या संस्थेनेदेखील केला. मात्र, अनेक बुद्धिवादी व संघटनांनी या योजनेचे स्वागत केलं. केंद्र सरकारच्या अर्थसहाय्यामुळे आर्थिक हलाखीत सुरू असलेल्या मदरशांचे अनेक प्रश्न सुटणार होते. तसेच पारंपरिक शिक्षण प्रणाली बाजूला होऊन आधुनिक व व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करणारी शिक्षणप्रणालीचा संचार त्यात होणार होता. हळूहळू करत काही मदरशांनी सरकारचे धोरण स्वीकारले. केंद्र सरकारकडे नोंदणी केल्यानंतर पोस्ट ग्रॅज्युएट शिक्षकांना १२ हजार, तर ग्रॅज्युएट शिक्षकांना ६ हजार प्रतिमाह मानधन देण्यात आले. मदरशांमध्ये आधुनिक शिक्षणासाठी लागणारे साहित्यदेखील सरकारकडून पुरवण्यात आले.

गेल्या १५ वर्षांत 'मदरसा आधुनिकीकरण' योजना एक महत्त्वाचा टप्पा ठरली आहे. योजनेमुळे मदरशांमध्ये व्यावसायिक व तंत्रज्ञानाचे शिक्षण सुरू झाले. त्यातून अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराची दारे खुली झाली आहेत. पण जागतिक पातळीवर सुरू असलेल्या स्पर्धेत मात्र ही शिक्षणप्रणाली कुठेच तोड देऊ शकली नाही. मुळात, मदरशांमधील पारंपरिक धाटणीची शिक्षण प्रणाली बदलण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. परंतु धर्मपीठाने ही मागणी नाकारत तीच शिक्षण प्रणाली सुरू ठेवली त्यामुळे मदरशांना संशयाने पाहिले जाऊ लागले. भाजप व संघ परिवाराने मदरशांना नाहक बदनाम केले. त्यातून सर्वसामान्यांमध्ये मदरशांबद्दल अनामिक भीती तयार झालेली आहे. त्यात कुठलेच तथ्य नाही, असा अहवाल भाजप सरकारने २०१४ मध्येच दिलेला आहे.

» उर्वरित पान ४